


# समान शिक्षण अभियान

## Equal Education Campaign

### आपल्या मुलांच्या उज्वल भविष्यासाठी



प्रिय पालक

आपली मुलगी/मुलगा निरोगी रहावे आणि आयुष्यात यशस्वी व्हावे अशी कोणत्या पालकांची इच्छा नसते? प्रत्येक पालकांची स्वप्न असतात की त्यांच्या मुलांना चांगलं करिअर, संसाधन आणि प्रतिष्ठापूर्ण जीवन मिळावे. आापल्या मुलांचे उज्चल भविष्य सुनिश्चित करण्यासाठी पालक कठोर परिश्रम करतात, त्याग करतात आणि सर्वतोपरी प्रयत्न करतात.

आपण अशा पालकांपैकी एक आहात. आपण आपल्या मुलांच्या उज्वल भविष्यासाठी कठोर परिश्रम करण्यास, त्याग करण्यास आणि सर्वतोपरी प्रयत्न करण्यास तयार आहात. आपणास माहित आहे की आपल्या मुलांचे उज्वल भविष्य शाळेमधून मिळणाऱ्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर आणि आपल्या शासन प्रणालीच्या संधींवर अवलंबून आहे. पण प्रश्न असा आहे की, "आपल्या मुलांना शाळेत उच्च-गुणवत्तेचे सर्वोत्तम शिक्षण मिळत आहे काय?" "त्यांना आयुष्यात यशस्वी होण्यासाठी सर्वोत्कृष्ट आणि समान संधी मिळत आहेत काय?"

जेव्हा आपण बघतो की आपल्या पाल्यास चांगल्या प्रतीचे शिक्षण आणि संधी मिळत नाहीत, तेव्हा आपण निराश आणि हताश होतो. कधीकधी आपण आपला राग दर्शवतो, परंतु बहुतेक वेळा आपण ते स्वतःचे आणि आपल्या मुलांचे भाग्य म्हणून स्वीकारतो. शिक्षणाचा अधिकार हा आपल्या घटनेतील मूलभूत हक्क आहे. राईट टू एज्युकेशन एक्ट, सर्व शिक्षा अभियान, माध्यमिक शिक्षा अभियान आणि आता समग्र शिक्षा अभियान, हे सर्व सुविधा आणि उच्च-गुणवत्तेच्या शिक्षणाचे वचन देतात. तरीही, ज्या शाळेत आपली मुलं शिकतात, तेथे कदाचित चांगली इमारत किंवा दिवे आणि पंखे नसतील, त्यात पिण्याचे पाणी आणि शौचालय यासारख्या मूलभूत सुविधा नसतील, पुरेसे शिक्षक नसतील, चांगले शिक्षण मिळत नसेल, कदाचित आपली मुलगी/मुलगा काहीही शिकत नसेल. जेव्हा आपण हे सर्व बघतो तेव्हा आपल्याला आपल्या मुलींचे/मुलांचे भविष्य अंधकारमय दिसते आणि कोणतीही आशा दिसत नाही.

परंतु आपण निराश होण्याची आवश्यकता नाही! चांगल्या प्रतीचे शिक्षण आणि समान संधी मिळविणे आपल्या पाल्यांचा मूलभूत हक्क आहे. तथापि, हे आमचे सामूहिक अपयश आहे की आपण आणि आपली शासन व्यवस्था आपल्या मुलांचे हक्क सुनिश्चित करण्यात अयशस्वी झालो आहोत. परंतु, केवळ सरकार, शाळा, शिक्षक इत्यादिंना दोष देवून काहीही होणार नाही. मग एक पालक म्हणून, एक प्रश्न आपल्या मनात येऊ शकतो, 'मी त्यात काय करू शकतो?' आपण म्हणू शकता "मी तर माझ्या मुलांच्या भाविष्यासाठी काहीही करायला तयार आहे."

समान शिक्षण अभियाना मध्ये आम्ही हेच करतोय- आपल्या मुलांसाठी एक समान दर्जेदार शिक्षण सुनिश्चित करण्याचा प्रयत्न - आणि येथे, आपण पालक म्हणून असहाय्य नाही. खरं तर, आपण, इतर पालक आणि काही प्रतिबद्ध सामाजिक कार्यकर्त्यांसह हे दृश्य बदलू शकतो. आपण आपल्या मुलांच्या शिक्षणाच्या हक्कांची जाणीव ठेवून, शाळा आणि समुदायासह एकत्र काम करून, आपल्या मुलांच्या शिक्षणामध्ये सहभागी होवून, मुलांसाठी चांगल्या सुविधा, चांगल्या प्रतीचे शिक्षण आणि संधी सुनिश्चित करू शकता. तर, या आपण समान शिक्षण अभियानामध्ये सहभागी होऊया आणि आपल्या मुलांचे भविष्य सुधारण्यासाठी आवश्यक पावले उचलूया.

आपल्याला कुठलेही धरणा प्रदर्शन, चक्का जाम, हिंसा इत्यादि करण्याची गरज नाही. आपल्याला कोणावरही टीका करण्याची गरज नाही. आपल्याला फक्त आपल्यासारखे पालक आणि काही प्रतिबद्ध सामाजिक कार्यकर्त्यांसोबत काम करण्याची गरज आहे. आपल्याला शाळा विकास योजना तयार करण्यात, त्याची अंमलबजावणी करण्यासाठी मदत करावी लागेल, सरकारकडून आवश्यक गोष्टींची मागणी करावी लागेल, सरकार आणि प्रशासनाला त्यांची जबाबदारी पूर्ण करण्याची मागणी करावी लागेल व मुलांच्या शिक्षणावर लक्ष केंद्रित करावे लागेल. आपण आपल्या मुलासाठी इतके काम निश्चितपणे करू शकता. तर चला, आपण एकत्र येवून आपल्या मुलांचे भविष्य उज्वल बनवूया.

समान शिक्षण अभियान कार्यकर्त्यांचे नाव : ______________________

मोबाइल नंबर: ______________________





